# Library & Information Centre

## GIT in NEWS

**Sakaal 09-01-2016**

# माजी विद्यार्थ्यांची जीआयटीला भेट

बेळगाव, ता. ८ : एच. पी. एन्टरप्राइज सर्व्हिसेसचे चिफ इन्फॉर्मेशन ऑफिसर अनिल कातर्की तसेच वॉशिंग्टन डीसी येथील ॲक्सेंचरचे वरिष्ठ अभियंता अमित कातर्की यांनी जीआयटी महाविद्यालयाला भेट देऊन प्राध्यापकांशी चर्चा केली. हे दोघेही जीआयटीचे माजी विद्यार्थी असून बहुराष्ट्रीय कंपनीत उच्च पदावर काम करत आहेत. श्री. अनिल यांनी माहिती तंत्रज्ञानातील सुरक्षिततेबाबत सांगितले. सायबर गुन्हे वाढल्याने त्याबाबत जागरूकता महत्त्वाची असल्याचे ते म्हणाले. श्री अमित यांनी विविध क्षेत्रांतील तांत्रिक उपाय कसे करता येतात, याची माहिती दिली. भारतासह अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया अशा विविध देशांमध्ये वेगवेगळ्या क्षेत्रात माहिती आणि तंत्रज्ञानाचा वापर सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. प्राचार्य ए. एस. देशपांडे यांनी माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. इन्फॉर्मेशन सायन्स ॲन्ड इंजिनिअरिंग विभागप्रमुख डॉ. एस. ए. कुलकर्णी यांनी आभार मानले.



**बेळगाव : प्राध्यापकांशी झालेल्या चर्चेत विचार मांडताना अनिल कातर्की. शेजारी अमित कातर्की.**